खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### मराठी विभाग : विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळा




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांचे स्वागत व सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. गणेश धुमाळ डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, डॉ. प्रभाकर जगताप




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळआणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेच्यासमारोप प्रसंगी उपस्थित विद्यार्थी

HRM

केसरी
राष्ट्रीय ठेवा

# 'भाषेच्या उपयोजनातून रोजगाराच्या संधी'



**राजगुरूनगर, (वार्ताहर)** : विद्यार्थ्यांचा कौशल्याधिष्ठित विकास होण्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्यांना वाचन, लेखन, संभाषण, संवाद कौशल्यांच्या स्वरूपातील भाषेचे उपयोजन प्रभावी करता आले, तर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा. संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. गगेश धुगाळ डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते. दोनदिवसीय कार्यशाळेत डॉ. संजय शिंदे यांनी मुद्रितशोधनाचे महत्त्व, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियम, प्रा. प्रतीक्षा खराडे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी

# भाषेच्या उपयोजनातून रोजगाराच्या संधी : डॉ. पिंगळे

राजगुरूनगर : (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांचा कौशल्याधिष्ठित विकास होण्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्यांना वाचन, लेखन, संभाषण, संवाद कौशल्यांच्या स्वरूपातील भाषेचे उपयोजन प्रभावी करता आले तर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले.

ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेच्या समारोप



प्रसंगी बोलत होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा. संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. गणेश धुमाळ डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते.

डॉ. शिरीष पिंगळे पुढे म्हणाले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याने भाषिक आविष्काराच्या विविध रूपांची ओळख करून घ्यायला हवी. विद्यार्थ्यांना आपल्या भाषेत उत्तम पद्धतीने संवाद साधता येणे, सर्जनशीलतेने लिहिता येणे, स्वतःचे विचार प्रकट करता येणे ही काळाची नितांत गरज बनली आहे.

त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ संजय शिंदे यांनी मुद्रितशोधनाचे महत्त्व, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियम, प्रा. प्रतीक्षा खराडे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**